आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता
९ जून २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- गेल्या ११ वर्षांत १४० कोटी भारतीयांच्या सामूहिक सहभागामुळे देशाने विविध क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवून आणलं असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- डीआरडीओच्या वाहन संशोधन आणि विकास संस्थेकडून नऊ संरक्षण प्रणालींचं तंत्रज्ञान १० भारतीय उद्योगांकडे हस्तांतरित

- छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन ट्रेनला मुंबईत प्रारंभ

- मध्य रेल्वेच्या दिवा आणि मुंब्रा स्थानकादरम्यान उपनगरी रेल्वेगाडीतून पडून आज चार प्रवाशांचा मृत्यू, इतर ९ जखमी

**आणि**

- जम्मू काश्मीरसह देशाच्या उत्तर भागात उष्णतेच्या लाटेची शक्यता

<><><><><>

गेल्या ११ वर्षांत १४० कोटी भारतीयांच्या सामूहिक सहभागामुळे देशाने विविध क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवून आणलं आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास हे तत्व अंगिकारून रालोआ सरकारने आर्थिक वाढीपासून ते सामाजिक उन्नतीपर्यंतची मजल मारली आहे. त्याविषयी अधिक जाणून घेऊयात...

**व्हॉईस कास्ट**

*गेल्या अकरा वर्षांत सरकारने लोककेंद्री आणि सर्वांगीण प्रगतीला प्राधान्य दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या संदेशात म्हणाले आहेत. जनधन योजनेतून ५५ कोटी जनतेला फायदा झाला आहे, ही संख्या यूरोपियन महासंघातल्या देशांच्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. आतापर्यंत ८१ कोटी जणांना मोफत अन्नधान्य पुरवठा करण्यात आला असून ही संख्या अमेरिकेच्या लोकसंख्येएवढी आहे. १५ कोटी घरांना नळाने पाणीपुरवठा करण्यात आला आहे. २५ कोटी शेतकऱ्यांना मृदा आरोग्य योजनेचं कार्डवाटप झालं आहे. सुमारे ४४ लाख कोटी रुपयांची थेट कर्जंही मंजूर झाली आहेत. तर मुद्रा योजनेद्वारे लघुउद्योगांना ५२ कोटींहून अधिक कर्जाचं वाटप करण्यात आलं आहे. भारत आज फक्त सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था नाही तर हवामान बदल*

*आणि डिजिटल नवोपक्रम यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर भूमिका मांडणारा आवाज झाला आहे. भारताच्या विकास यात्रेविषयी नमो ॲपवर उपलब्ध व्हिडीओ, ग्राफिक्स आणि लेख यांच्या माध्यमातून जाणून घेण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं आहे.*

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने देशाची राजकीय संस्कृती बदलली असून प्रत्यक्ष कामगिरी, जबाबदारी आणि प्रतिसाद याला महत्त्व दिलं असल्याचं भाजपा अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जे पी नड्‌डा यांनी आज सांगितलं. मोदी सरकारला ११ वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त नवी दिल्लीत आयोजित पत्रकारपरिषदेत ते बोलत होते. हे सरकार प्रभावी आणि खंबीर निर्णय घेणारं असून प्रशासनात पारदर्शकतेचं नवीन परिमाण या सरकारने प्रस्थापित केलं आहे असं ते म्हणाले. गेल्या ११ वर्षात मोदी सरकारने विकसित भारताचा पाया घातला असं ते म्हणाले. २०१४च्या आधीचं सरकार भ्रष्टाचारात अडकलं होतं असा आरोप करुन ते म्हणाले की त्यानंतर चित्र बदललं असून देशात आशावादी वातावरण आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात अहिल्यानगर इथल्या संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात डीआरडीओच्या वाहन संशोधन आणि विकास संस्थेनं नऊ संरक्षण प्रणालींचं तंत्रज्ञान १० भारतीय उद्योगांना हस्तांतरित केलं आहे. या प्रणालींमध्ये रसायनिक, जैविक, किरणोत्सारी, अण्विक, रेकी वाहन, माउंटेड गन सिस्टीम, दहशतवादी-विरोधी वाहन आणि दंगल नियंत्रण वाहन वज्र यांचा समावेश आहे. तंत्रज्ञान हस्तांतरण समारंभाला डीआरडीओचे अध्यक्ष डॉ. समीर कामत उपस्थित होते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान स्वदेशी बनावटीच्या प्रणालींनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल डीआरडीओ आणि संबंधित उद्योगाचं कामत यांनी कौतुक केलं. दरम्यान, नव्या तंत्रज्ञानावर सहकार्य करण्यासाठी वाहन संशोधन आणि विकास संस्थेनं पुण्यातील सीओईपी विद्यापीठासोबत सामंजस्य करार केला आहे.

**<><><><><>**

काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेला गेलेल्या शिष्टमंडळानं काल अंतिम टप्प्यात वॉशिंग्टनमध्ये अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स आणि उप परराष्ट्रमंत्री क्रिस्टोफर लँडौ यांच्यासह विविध राजकीय नेत्यांची भेट घेतली आणि सीमापार दहशतवादाबद्दल भारताच्या भूमिकेविषयी माहिती दिली. हे शिष्टमंडळ ३ जून रोजी अमेरिकेत पोहोचलं आणि तीन दिवसांच्या कालावधीत त्यांनी कॅपिटल हिल तसंच वॉशिंग्टनमध्ये विविध बैठका घेऊन, अमेरिकेतले संसदसदस्य, सरकारी अधिकारी यांना माहिती दिली. या शिष्टमंडळानं गयाना, पनामा, कोलंबिया आणि ब्राझीललाही भेट दिली.

**<><><><><>**

भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळ अर्थात आयआरटीसीटीनं ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याशी संबंधित भेट देणारी, 'छत्रपती शिवाजी महाराज' ही विशेष सर्किट गाडी सुरु केली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मंत्री आशिष शेलार आणि इतर मान्यवर तसेच या पहिल्या गाडीचे प्रवासी उपस्थित होते. ही गाडी आज पहिल्या दिवशी रायगड किल्ला येथे भेट देणार आहे.त्यानंतर शिवनेरी किल्ला, प्रतापगड किल्ला, पन्हाळा किल्ला, लाल महाल, कसबा गणपती, शिवसृष्टी या ठिकाणांना भेट देणार आहे. या ५ दिवसांच्या विशेष प्रवासात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत.

**<><><><><>**

मध्य रेल्वेमार्गावर दिवा-मुंब्रा स्थानकादरम्यान कसाऱ्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणाऱ्या उपनगरी रेल्वेगाडीतून पडून आज चार प्रवाशांचा मृत्यू झाला तर नऊ जण जखमी झाले. मध्य रेल्वेने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, दोन विरुद्ध दिशांना जाणाऱ्या उपनगरी गाड्यांमध्ये दारात लटकून प्रवास करणारे प्रवासी एकमेकांना घासून रुळांवर पडले. ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलेल्या तिघांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची माहिती ठाणे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी दिली. तर कळव्याच्या रुग्णालयानं दिलेल्या माहितीनुसार एका जखमीचा रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू झाला होता. इतरांवर रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. आणखी तपशीलांची प्रतीक्षा आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><>**

छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात नक्षल्यांनी केलेल्या आयईडी स्फोटात अतिरिक्त पोलीस अधीक्षक आकाश राव यांना आज वीरमरण आलं. नक्षल्यांनी उद्या या भागात पुकारलेल्या बंदच्या पार्श्वभूमीवर पोलीस पथक गस्त घालत असताना ही घटना घडली. दोंड्रा या गावाजवळ नक्षल्यांनी आयईडी स्फोटक पेरलं होतं. यात आकाश राव शहीद झाले तर आणखी काही जवान जखमी झाले आहेत.

**<><><><>**

गाझाच्या दिशेनं मदत सामुग्री घेऊन जाणाऱ्या एका जहाजाला इस्रायलच्या सैन्यानं पुढे जाण्यापासून रोखलं आहे. या जहाजातून पर्यावरणवादी ग्रेटा थनबर्ग आणि काही आंतरराष्ट्रीय स्तरावरचे सामाजिक कार्यकर्ते प्रवास करत आहेत. एका सामाजिक संस्थेनं या जहाजातून मानवतेच्या दृष्टिकोनातून गाझाला मदत म्हणून सामान पाठवलं होतं. इस्रायली सैन्यानं सर्व प्रवाशांना ताब्यात घेतलं असून जहाज इस्रायल कडे वळवलं आहे.

**<><><><><>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत स्पेनच्या कार्लोस अल्काराझने पुरूष एकेरीचं विजेतेपद पटकावलं. अल्काराझनं सलग दुसऱ्यांदा हे विजेतेपद मिळवलं आहे. काल रात्री झालेल्या सामन्यात इटलीच्या यानिक सिन्नरचा त्यानं ४-६, ६-७, ६-४, ७-६, ७-६ असा पाच सेटमध्ये पराभव केला. या विजयासह अल्काराझनं पाचवे ग्रँड स्लॅम विजेतेपदही जिंकलं.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये सांबा आणि जम्मू इथं उष्णतेची लाट आली असून गेल्या तीन दिवसांपासून तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर आहे. सांबा इथं काल ४३ पूर्णांक ९ अंश सेल्सिअस तर जम्मू मध्ये ४२ पूर्णांक ७ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आलं. येत्या पाच दिवसात जम्मू आणि परिसरात उष्णतेची लाट कायम राहील, असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

<><><><><>

मुसळधार पावसामुळं उत्तर सिक्कीममधे अनेक ठिकाणी दरडी कोसळल्यानं संपर्क तुटला आहे. त्यामुळं चाटेन, लाचेन इथं अनेक पर्यटक अडकले आहेत. त्यापैकी २८ जणांना आणि २० लष्करी कर्मचाऱ्यांना काल विमानानं पाक्योंगला आणण्यात आलं, तर एमआय-१७ हेलिकॉप्टरनं चाटेन इथं तैनात असलेल्या लष्करी कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक साहित्यदेखील पोहोचवलं. आसाममधे पूर स्थितीत सुधारणा झाली आहे. राज्यातल्या बहुतेक नद्यांचे प्रवाह धोक्याच्या पातळीवरून खाली उतरले आहेत. मात्र, अद्याप ११ जिल्ह्यातल्या ७४० गावांमध्ये २ लाख ५० हजारांहून अधिक लोक पुरात अडकले असून, बचाव कार्य सुरू आहे.

**<><><><><>**

हरियाणा, चंदीगड, दिल्ली, जम्मू आणि काश्मीर, लडाख, पंजाब, राजस्थान आणि उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी आज उष्णतेच्या लाटेची शक्यता भारतीय हवामान विभागानं  वर्तवली आहे.

**//<><><><><>//**